JANATECHA MARATHI/ ENGLISH

9004249262 | navimumbaivarta2021@gmail.com | Jantecha Navi Mumbai Varta

NAVI MUMBAI VARTA

Executive Editor : Nazima Patel | RNI-MAHBIL/2023/86305 | Postal Registration Number : NMB/302/2024-26 | Posting day every Wednesday, Vashi, Navi Mumbai

Thane - Navi Mumbai • Tuesday, Date : 10 FEB To 16 FEB 2026 | • Vol 3 | • Issue : 28 | • Price Rs. 2 | • pages : 4

Navi Mumbai Gets New Leadership: Sujata Patil & Dashrath Bhagat Take Charge

■ Navi Mumbai (Nazima Patel)

In a historic and unanimous outcome, Sujata Suraj Patil was elected mayor and Dashrath Sitaram Bhagat as deputy mayor of the Navi Mumbai Municipal Corporation on 5th February, after their opponents withdrew from the race. The election results were officially announced by Thane Zilla Parishad CEO Ranjit Yadav, who also felicitated the newly elected leaders.

During the inaugural ceremony, the mayor and deputy mayor paid heartfelt tribute to the late Deputy Chief Minister Ajit Pawar. Municipal Commissioner Dr. Kailas Shinde welcomed them with bouquets and warm congratulations.

Speaking on her vision, Mayor Sujata Patil emphasized priorities such as sanitation, healthcare, education, environment, and traffic planning. She highlighted youth empowerment, women's safety, respect for senior citizens, and seamless civic services, pledging disciplined and inclusive governance. Her election also marks a significant milestone for women's representation and leadership in society.

Deputy Mayor Dashrath Bhagat assured citizens of his dedication to Navi Mumbai's rapid development and stressed that future initiatives will focus on collaboration with all civic members.

The ceremony witnessed the presence of dignitaries including Additional Commissioner Sunil Pawar, Dr. Rahul Gethe, former MP Sanjeev Naik, former MLA Sandeep Naik, department heads, and other prominent figures who extended their congratulations to the new leadership.





Navi Mumbai Municipal Corporation Bags Two National Gold Awards!

■ Navi Mumbai (Nazima Patel)

Navi Mumbai Municipal Corporation (NMMC) has become the only urban local body in India to win two National Excellence Gold Awards simultaneously for green energy and energy efficiency initiatives.

The awards recognize NMMC's achievements in energy-efficient LED street lighting, solar-powered street lights, and electric vehicle (EV) charging infrastructure. The awards were presented on 4th February in Delhi at the 14th Green Energy Summit organized by the Indian Chamber of Commerce and Deloitte. NMMC's Executive Engineer Praveen Gade accepted the awards, with Sub-Engineer Santosh Moraskar also present. Mayor Sujata Patil, Deputy Mayor Dashrath Bhagat, and Commissioner Dr. Kailas Shinde congratulated NMMC citizens and officials for this national recognition. Awards were based on energy savings achieved, renewable energy use, GHG reduction, investment returns, certifications, innovation, strategic vision, implementation, and sustainability impact. Evaluation was conducted in two stages with 75% weightage in stage one and 25% in stage two, under the guidance of senior experts from the energy sector.

The selection committee included former Secretary of the Government of India Energy Department Anil Razdan, Ashwini Kumar (former MD, Solar Energy Corp. of India), Girish Pradhan (former Chair, CERC), Nirja Mathur (former Chair, CEA), and Saurabh Kumar (Vice-Chair, Global Energy Alliance).

NMMC's Achievements in Numbers:

- **Energy-efficient Street Lighting: 51,339 lights (50,722 LED + 617 solar) ensuring major energy savings and safe roads.**
- **EV Charging Infrastructure: 56 stations operational; 14 more under construction; promotion of e-buses and private EVs.**
- **Energy Savings & Renewable Energy: 9,125 MWh saved; solar projects for public buildings, toilets, and infrastructure.**
- **City Profile – Navi Mumbai serves approximately 18.5 lakh residents, managing around 95 MW of electricity demand.**
- **The awards highlight NMMC's citizen-focused policies, coordinated governance, and commitment to a green and sustainable future, marking its transformation from a planned city to a planet-positive city, said Commissioner Dr. Kailas Shinde.**

T20 World Cup: Abhigyan Kundu from Navi Mumbai Shines in U19 World Cup!



■ Koparkhairne (Ashwini Tawade)

Abhigyan Kundu, the sparkling wicketkeeper from India's U19 cricket team, has now become not just a team asset but a pride of Navi Mumbai! His outstanding performances in the recently concluded U19 World Cup and T20 tournaments have caught everyone's attention.

Shri Swami Vivekananda Shikshan Sanstha—Trained from a young age at a local cricket academy, Abhigyan Kundu is now ready to elevate India's glory on the bigger international stage. Citizens of Navi Mumbai take pride in his achievements and eagerly look forward to his next international appearance. Abhigyan says, "None of this would have been possible without the support of Navi Mumbai and my family. Every victory belongs to them."

23rd Frames Film Festival 'Kirdaar'

Concludes at SIES Nerul

■ Nerul (Janatecha Navi Mumbai Varta):

The 23rd Frames Film Festival concluded on 7 February 2026 at SIES (Nerul) College, celebrating music videos, national indie films, and outstanding storytelling. The day featured screenings of shortlisted music videos like Beautiful Memories and Tim Tim and national indie films including Bhairavi and Scapegoat.

The Awards Ceremony honored winners across categories: Celestial (International Short Film), Brahmakamal (National Short Film), Return to the Sky (Documentary), 113 Words for You (Animation), Beautiful Memories (Music Video), and Bhairavi (National Indie Film), with Mr. Piyush Sawant receiving Best Director. Under the guidance of Principal Dr. Koel Roy Choudhury and the faculty, the festival celebrated creativity, collaboration, and meaningful cinema, leaving participants inspired and connected.



TMC Recovers Rs. 9.88 Crore in 15 Days in Water Bill Drive

■ Thane (Sunil Tawade):

Thane Municipal Corporation has intensified action against water bill defaulters, recovering Rs. 9.88 crore from January 20 to February 5, 2026. Measures included disconnection of water connections, seizure of pumps, sealing of pump rooms, and issuing notices to defaulters.

A total of 1,074 water connections were disconnected, 202 pumps seized, 75 pump rooms sealed, and 5,056 notices issued across various wards. The largest collections were from Majivada/ Manpada (Rs. 2.16 crore), Naupada Kopri (Rs. 1.57 crore), and Kalwa (Rs. 1.22 crore). The drive will continue, and citizens are urged to pay their water bills on time.

संपादकीय


'देवा' भाऊंच्या मनात...



देशातील सर्वात मोठी महापालिका असा लौकीक असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत यंदा ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग लागला. भाजप महायुतीचा महापौर बसेल हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. 'देवा'भाऊंच्या मनात असेल तोच महापौर होईल. अशी राजकीय वर्तुळातील चर्चा आहे. महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकींचा निकाल दोन दिवसांपूर्वी जाहीर झाला. पुन्हा एकदा भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. एवढंच नव्हे तर महापालिकांच्या एकूण २८६९ प्रभागांतून भाजपचे १४२५ नगरसेवक निवडून आले. भाजपच्या विजयी नगरसेवकांचा आकडा सर्वाधिक आहे. त्या खालोखाल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला यश मिळाले. त्यांचे ३३९ नगरसेवक निवडून आले. तिसऱ्या क्रमांकावर काँग्रेस असून, त्यांची संख्या ३३४ आहे. राज्यात महायुतीत सत्तेत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीने अनेक ठिकाणी भाजपला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. पुणे-चिंचवड महापालिकेत विरोधकांशी हातमिळवणी केली. त्यातून त्यांना १६७ नगरसेवकांना निवडून आणण्यात यश लाभले. या महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणून लढताना अपवादात्मक स्थितीत पाहायला मिळाले. महायुतीतील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांचा राज्यात बोलबाला होता. याआधी झालेल्या नगर परिषद, नगर पंचायतीच्या निवडणुकीतही विरोधक लढताना कुठे दिसले नाहीत. त्यामुळे सत्ताधारी पक्षांचे जे उमेदवार बिनविरोध निवडून आले, त्यांच्यावर टीका करत, रडीचा डाव खेळण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला. महापालिका निवडणुकीत निवडून आलेल्या ६६ उमेदवारांच्या निकालाला स्थगिती द्यावी यासाठी विरोधकांकडून उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवण्यात आले; परंतु त्यांच्या याचिका फेटाळून लावल्या. सत्ताधाऱ्यांपुढे आपली डाळ शिजणार नाही म्हणून निवडणुकीच्या आधीपासून निवडणूक आयोगापुढे प्रश्नचिन्ह उभे करून त्यांच्यावर संशयाच्या नजरेतून आरोप केले; परंतु निकालाची प्रक्रिया पार पडताना, राज्यभरात कुठेही राज्य निवडणूक आयोगाला आरोपींच्या पिंजऱ्यात पकडता यावे, अशी संधी विरोधकांना मिळाली नाही.

देशातील सर्वात मोठी महापालिका असा लौकीक असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत यंदा ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग लागला. भाजप महायुतीचा महापौर बसेल हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. २२७ सदस्य संख्या असलेल्या मुंबई महापालिकेत भाजपचे सर्वाधिक ८९ नगरसेवक निवडून आले आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेच्या २९ नगरसेवकांची जोड मिळाल्याने बहुमताचा ११४ चा जादुई आकडा महायुतीने पार केला आहे. महाराष्ट्रातील अन्य महापालिकेत सत्ता मिळो ना मिळो, पण मुंबई महापालिकेत कोणत्याही परिस्थितीत सत्ता हवीच, यासाठी उबाठाने रणनीती आखली होती. मराठी अस्मिता, मराठी माणूस या मुद्यांवर भावनिक साद घालत २० वर्षांपासून अलिप्त राहिलेले ठाकरे बंधू एकत्र आले होते. सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून उल्लेख केला जातो, ती मुंबई महापालिका ठाकरे बंधूंच्या हातातून निसटली. २५ वर्षे मुंबई महापालिकेत सत्तेवर असताना, मराठी माणसाचे हित पाहिले असते, तर मराठी माणूस मुंबईबाहेर हद्दपार झाला नसता, याचे आत्मचिंतन करण्याची वेळ ठाकरे बंधूंवर आली आहे. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होणार? मुंबई उद्योगपतींच्या घशात घालण्याचा कट? असा विखारी प्रचार ठाकरे बंधूंकडून करण्यात आल्यानंतर त्याचा काहीही उपयोग झाला नाही. मुंबई महापालिकेत सर्वपक्षीय १४७ मराठी भाषिक नगरसेवक निवडून आले आहेत. त्यात भाजपच्या ८९ पैकी ५६ नगरसेवकांचा समावेश आहे. महायुती सत्तेवर आली, तर हिंदू मराठी महापौर बसेल अशी स्पष्ट भूमिका भाजपने निवडणूक प्रचारात जाहीर केली होती. मराठी-अमराठी असा भेद न करता केवळ मुंबईच्या विकासाचे 'व्हिजन' घेऊन महायुतीने प्रचार केला होता. कोस्टल रोड, मेट्रोसारख्या प्रकल्पाचे केलेले काम जनतेपुढे ठेवल्याने मुंबईतील जेनझी (तरुण) हा महायुतीच्या पाठिशी उभा राहिला हे निकालातून स्पष्ट झाले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा गद्दार असा उल्लेख करत त्यांना हिणवण्याचा वारंवार प्रयत्न केला. निकालानंतर आता उबाठाची भाषा बदललेली दिसत आहे. शिंदे यांच्या शिवसेनेचे २९ नगरसेवक आपल्यासोबत आले तर, सत्तेचे स्वप्न पुरे होईल, अशी भाबडी आशा उबाठाला वाटत आहे. मातोश्रीवर भेटीसाठी आलेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांना संबोधताना उबाठा सेनेच्या पक्ष प्रमुखाने 'देवाच्या मनात असेल तर महापौर आमचाच होईल' असे विधान करून भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीचा महापौर होणार ही देवाची इच्छा आहे, अशी प्रतिक्रिया देऊन या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. तरीही 'देवा'भाऊंच्या मनात असेल तोच महापौर होईल. अशी राजकीय वर्तुळातील चर्चा आहे; परंतु यानिमित्ताने सत्तेसाठी उबाठा किती लाचार आहे हे जनतेला आता कळून येत आहे. 'सूर्याजी पिसाळ', 'जयचंद', 'गद्दार', 'नकली' अशा अनेक उपमा देऊन एकनाथ शिंदे यांना हिणवण्यात आले होते. आता त्याच एकनाथ शिंदे यांच्यासाठी उबाठा पायघड्या घालत आहे, अशी भाषा उबाठाच्या नेत्यांकडून येत आहे. मुंबई महापालिकेत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना 'किंग मेकर'च्या भूमिकेत आली आहे. त्यामुळेच की काय, आता उबाठाकडून त्यांना चुचकारण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला आहे असे चित्र दिसत आहे. राज्यात दोन ब्रँडची चर्चा होती, त्या ठाकरे आणि पवार ब्रँडच्या निकालानंतर बोऱ्या वाजल्याचे स्पष्ट झाले. संपूर्ण राज्यात उबाठाचे फक्त १५५ नगरसेवक निवडून आले, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे ३६ नगरसेवक निवडून आले आहेत. मुंबईत बहुमताचा आकडा नसतानाही सत्ता मिळावी अशी दिवसाउजेडा उबाठाच्या नेत्यांना स्वप्ने पडत असतील, तर तो आनंद त्यांना घेऊ दे! यापुढे त्यांच्याकडे दुसरे काही उरलेले नाही, असेच म्हणावे लागेल.

रात्री १ वाजता परतलेले रासायनिक स्मॉग प्रदूषण; नवी मुंबईच्या हवेतला हा 'मूक मारेकरी'



५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री साधारण १ वाजता नवी मुंबईने पुन्हा एक भयावह अनुभव घेतला. काही क्षणांत हवेत जडपणा जाणवू लागला, दृष्यमानता कमी झाली आणि शहरावर एक विषारी धुराची चादर पसरली. ही परिस्थिती अनेक नागरिकांना आता ओळखीची वाटू लागली आहे, कारण गेल्या काही वर्षांपासून आपण अशा घटनांना वारंवार सामोरे जात आहोत. परंतु एक गोष्ट मी अत्यंत ठामपणे आणि जबाबदारीने सांगू इच्छितो की ही धुके नव्हते. ही हिवाळ्यातील नैसर्गिक धुंदी नव्हती. हा रासायनिक स्मॉग होता. हा वायू प्रदूषणाचा तो प्रकार होता, ज्यामध्ये औद्योगिक उत्सर्जन, रासायनिक कण, सूक्ष्म धूळ आणि विषारी वायू मिसळून आपल्याच शहरातील नागरिकांच्या फुफ्फुसांमध्ये प्रवेश करत होते आणि सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे बहुतेक लोक त्या वेळेस झोपेत होते. (छायाचित्र व ए. क्यू .आय.रीडिंग सोबत जोडले आहे) मी हा लेख एक सामान्य नागरिक म्हणून लिहितो, पण त्याहीपेक्षा एक शिक्षक म्हणून लिहितो, कारण मला दररोज मुलांमध्ये वाढत चाललेली खोकला, ॲलर्जी आणि श्वास घेण्यातील अडचण दिसते. मी एक पर्यावरणप्रेमी म्हणून लिहितो, कारण मी सतत या मुद्द्यावर आवाज उठवत आलो आहे. आणि मी एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून लिहितो, कारण मी या शहराला शांतपणे गुदमरू देण्यास तयार नाही.

रासायनिक वायू प्रदूषणाबद्दल आपण यापूर्वीही बोललो आहे. त्यावर लेख लिहिले, व्हिडीओ केले, फोटो दिले, प्रशासनाला मेल पाठवले, पुरावे सादर केले, आणि नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तरीही हे प्रदूषण परत परत येत आहे, अधिक तीव्रतेने येत आहे, अधिक वारंवारतेने येत आहे आणि अधिक धोकादायक स्वरूपात आपल्यावर आक्रमण करत आहे.

या वेळेसची घटना फक्त "दिसलं म्हणून सांगितलं" इतकी मर्यादित नव्हती. या वेळेस वास्तव मोजता येण्यासारखे होते. कारण माझ्याकडे असलेल्या AQI मशीनवर, जे मी स्वतःच्या पैशातून फक्त या सामाजिक आणि पर्यावरणीय कारणासाठी विकत घेतले आहे, त्यावर AQI ने ७०० चा आकडा पार केला. होय, AQI ७०० च्या पुढे गेला. ही केवळ आकड्यांची चर्चा नाही. हा आरोग्याच्या दृष्टीने धोक्याचा आणि आपत्कालीन स्थितीचा स्पष्ट संकेत आहे.

मी AQI मशीन स्वतः का विकत घेतले? कारण अनेक वेळा प्रशासनाकडे योग्य आणि पारदर्शक माहिती नसते, किंवा माहिती असते पण ती जनतेसमोर येत नाही. काही वेळा नागरिकांच्या तक्रारींना "हंगामी धुके" म्हणून दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे मी ठरवले की केवळ भावना नाही तर ठोस डेटा देखील जनतेसमोर आणायचा. जागृती ही केवळ पोस्ट आणि घोषणांपुरती मर्यादित न राहता पुराव्यावर आधारित असली पाहिजे. आणि हा पुरावा जेव्हा AQI ७०० च्या पुढे जातो, तेव्हा आपण शांत बसणे म्हणजे स्वतःच्या आरोग्याशी आणि भविष्यासोबत तडजोड करणे आहे.

AQI ७०० च्या पुढे जाणे ही सामान्य गोष्ट नाही. त्या पातळीवर आपण "थोडं प्रदूषण वाढलं" असे म्हणू शकत नाही. त्या पातळीवर आपण "हिवाळा आहे म्हणून असेल" असे म्हणू शकत नाही. त्या पातळीवर आपण "मास्क लावा आणि पुढे चला" असे सहज सांगू शकत नाही. हा आपत्कालीन इशारा आहे. ही सार्वजनिक आरोग्याची लाल घंटा आहे.

नवी मुंबई ही नियोजनबद्ध शहर म्हणून ओळखली जाते. अनेक वेळा आपण अभिमानाने सांगतो की इथे रस्ते व्यवस्थित आहेत, सेक्टर नियोजनबद्ध आहेत, शहर शिस्तबद्ध आहे, आणि इतर शहरांच्या तुलनेत नवी मुंबई अधिक स्वच्छ आहे. पण माझा प्रश्न असा आहे की जर आपण श्वास घेण्यासाठी स्वच्छ हवा देऊ शकत नसू, तर त्या विकासाचा उपयोग काय? जर नागरिक झोपेत असताना त्यांच्या घरातही विषारी हवा शिरत असेल, तर त्या आधुनिकतेचा अर्थ काय? विकासाचा खरा मापदंड इमारती नाहीत, तर नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षित जीवन आहे.

रासायनिक स्मॉग म्हणजे नेमकं काय? हा फक्त धूर नाही. हा विविध विषारी वायू, सूक्ष्म कण आणि रासायनिक प्रदूषकांचे मिश्रण असतो. हे कण इतके सूक्ष्म असतात की ते फुफ्फुसांच्या खोल भागात जाऊन थेट रक्तप्रवाहावर परिणाम करू शकतात. अनेकदा त्याचा परिणाम लगेच जाणवत नाही. पण शरीरात तो नुकसान करत राहतो. फुफ्फुसं शांतपणे जखमी होत राहतात. हृदयावर दबाव वाढतो. शरीराची प्रतिकारशक्ती कमी होते. आणि मग एखाद्या दिवशी तीच व्यक्ती दवाखान्यात पोहोचते.

या प्रदूषणाचा सर्वात मोठा फटका मुलांना बसतो. मुलांची फुफ्फुसं विकसित होत असतात. त्यांची प्रतिकारशक्ती तयार होत असते. अशा वेळी जर त्यांना सतत विषारी हवा मिळत राहिली, तर त्यांच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होतो. आज अनेक पालकांना वाटते की मुलांचा खोकला हा "हवामान बदलामुळे" आहे. पण सत्य हे आहे की हवेतले प्रदूषण हे त्यामागचे मोठे कारण आहे. शाळेत अनेक मुलं सतत थकलेली दिसतात, वारंवार आजारी पडतात, लक्ष लागत नाही, श्वास घेण्यात त्रास होतो. शिक्षक म्हणून मला हे रोज जाणवतं.

ज्येष्ठ नागरिकांसाठी ही परिस्थिती अधिक धोकादायक आहे. अनेक ज्येष्ठांना आधीच दम्याचा त्रास, COPD, हृदयविकार, मधुमेह किंवा रक्तदाबाचा त्रास असतो. अशा परिस्थितीत AQI ७०० च्या वर जाणे म्हणजे त्यांच्या आरोग्यावर थेट हल्ला आहे. श्वास घ्यायला त्रास होणे, छातीत दडपण येणे, अचानक चक्कर येणे, हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याची शक्यता वाढणे, हे सर्व धोके वाढतात.

कामगार वर्ग, रात्रीच्या शिफ्टमधील कर्मचारी, सुरक्षा रक्षक, डिलिव्हरी बॉय, रस्त्यावर काम करणारे लोक यांच्याकडे "घरात राहा" हा पर्यायच नसतो. त्यांना त्या विषारी हवेतही काम करावे लागते. हे प्रदूषण केवळ पर्यावरणीय समस्या नाही, तर सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. कारण सर्वात जास्त त्रास त्या लोकांना होतो, जे स्वतःचे संरक्षण करण्यासाठी महागडे उपाय करू शकत नाहीत.

या घटनेत आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे वेळ. ही घटना रात्री १ वाजता घडली. म्हणजे जेव्हा बहुतेक नागरिक झोपलेले असतात, प्रशासनाची नजर कमी असते, तपास यंत्रणा सक्रिय नसते, आणि निरीक्षणाची शक्यता कमी असते. अशा वेळेस रासायनिक स्मॉग निर्माण होणे हा प्रश्न निर्माण करतो की रात्रीच्या वेळेत काही ठिकाणी नियमबाह्य उत्सर्जन होत आहे का? काही औद्योगिक युनिट्स रात्री जास्त प्रमाणात प्रदूषण करत आहेत का? काही ठिकाणी जाळपोळ किंवा रासायनिक वायूंचे उत्सर्जन होत आहे का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे.

रासायनिक प्रदूषण अचानक होत नाही. ते कुठल्या तरी स्रोतामुळेच होते. आणि जर त्यावर कारवाई होत नसेल, तर त्यामागे अकार्यक्षमता, दुर्लक्ष किंवा संरक्षण आहे, हे मान्य करावे लागेल. नियम आहेत, पण अंमलबजावणी नाही. दंड आहेत, पण भीती नाही. निरीक्षण आहे, पण सातत्य नाही. हीच सर्वात मोठी समस्या आहे.

मी पुन्हा पुन्हा सांगतो आणि आज पुन्हा सांगतो की वायू प्रदूषण हा अजेंड्यावर असायलाच हवा. हे फक्त घोषवाक्य नाही. हे धोरणात्मक निर्णय असायला हवेत. हे केवळ सोशल मीडियावर ट्रेंड नसावा, तर प्रशासनाच्या प्राधान्यक्रमात पहिल्या क्रमांकावर असावा.

AQI ७०० च्या वर जाणे म्हणजे आपल्याला तातडीने कृती करावी लागेल. नवी मुंबईमध्ये अधिक आणि विश्वासार्ह रिअल टाइम मॉनिटरिंग स्टेशन असणे गरजेचे आहे. एका मशीनवर किंवा एका ठिकाणच्या आकड्यांवर शहराचे संपूर्ण चित्र समजू शकत नाही. प्रत्येक सेक्टर, औद्योगिक क्षेत्र, महामार्ग, बांधकाम क्षेत्र, डंपिंग क्षेत्र या सर्व ठिकाणी प्रदूषणाचे स्वरूप वेगळे असते. म्हणून शहरभर नेटवर्क तयार करणे आवश्यक आहे.

पारदर्शक माहिती ही नागरिकांचा अधिकार आहे. नागरिकांना त्यांच्या शहरातील हवा किती विषारी आहे हे जाणून घेण्यासाठी खासगी उपकरणांवर अवलंबून राहावे लागणे ही प्रशासनाची अपयशाची निशाणी आहे. AQI डेटा सार्वजनिक करणे, नियमित अपडेट करणे, धोकादायक पातळीवर अलर्ट देणे, शाळांना सूचना देणे, आरोग्य सल्ला जारी करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

या समस्येचे मूळ कारणेही तितकीच महत्त्वाची आहेत. नवी मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू आहे. अनेक ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाय दिसत नाहीत. ग्रीन नेट नाहीत, पाणी फवारणी नाही, मटेरियल झाकून वाहतूक नाही. परिणामी धूळ रस्त्यावर पसरते आणि शहरभर वाहून जाते. नियम कागदावर आहेत, पण जमिनीवर नाहीत. धूळ प्रदूषण एकटंही घातक आहे, पण जेव्हा ते रासायनिक प्रदूषणासोबत मिसळते, तेव्हा ते अधिक प्राणघातक बनते.

औद्योगिक उत्सर्जन हा आणखी मोठा मुद्दा आहे. जर रात्रीच्या वेळेस स्मॉग निर्माण होत असेल, तर औद्योगिक क्षेत्रांमध्ये रात्रीच्या वेळेस विशेष तपासणी आवश्यक आहे. सतत उत्सर्जन मोजणी प्रणाली उद्योगांवर बंधनकारक असावी. अचानक तपासण्या व्हाव्यात. नियमभंग करणाऱ्यांवर मोठ्या दंडात्मक कारवाया व्हाव्यात. फक्त प्रतीकात्मक दंड देऊन काहीही बदलणार नाही.

कचरा जाळणे हा देखील मोठा स्रोत आहे. प्लास्टिक, रासायनिक कचरा, मिश्र कचरा जाळल्याने अत्यंत विषारी वायू निर्माण होतात. हे प्रदूषण नाही, तर थेट विषप्रयोग आहे. स्थानिक प्रशासनाने कचरा व्यवस्थापन मजबूत करणे आणि जाळपोळीवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे.

वाहतूक प्रदूषण देखील दुर्लक्षित करता येणार नाही. वाहनांची संख्या वाढत आहे, जड वाहनांची वर्दळ आहे, ट्रॅफिक वाढतोय. प्रदूषण नियंत्रणासाठी सार्वजनिक वाहतूक सुधारणा, वाहन तपासणी, आणि वाहतूक नियोजन हेही महत्त्वाचे आहे. पण या सर्व उपायांपेक्षा मोठा प्रश्न आहे जबाबदारीचा. AQI ७०० च्या वर गेल्यावर कोण जबाबदार? नागरिक आजारी पडल्यावर कोण उत्तर देणार? मुलांना दम्याचा त्रास झाल्यावर कोण जबाबदारी घेणार? वैद्यकीय खर्च वाढल्यावर सामान्य कुटुंबांना कोण मदत करणार? प्रशासनाने या प्रश्नांना उत्तर दिले पाहिजे.

या लढ्यात समाजाची भूमिका महत्त्वाची आहे. नागरिकांनी शांत बसू नये. प्रदूषण दिसले तर फोटो, व्हिडिओ, वेळ आणि ठिकाण नोंदवा. संबंधित यंत्रणांना माहिती द्या. लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारा. प्रशासनाला जबाबदार ठेवा. जागृती ही दबावात रूपांतरित झाली पाहिजे आणि दबाव हा धोरणात्मक बदलात रूपांतरित झाला पाहिजे.

वायू प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही. हा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. हा आर्थिक प्रश्न आहे. हा मानवी हक्कांचा प्रश्न आहे. स्वच्छ हवा ही कोणत्याही शहरातील नागरिकांची मूलभूत गरज आहे आणि अधिकार आहे.

मी स्वतःच्या पैशातून AQI मशीन विकत घेतले, कारण मला सत्य मोजायचे होते. मला दाखवायचे होते की हा मुद्दा "भावनिक" नाही, तो वैज्ञानिक आहे. हा प्रश्न "हवामानाचा" नाही, तो मानवनिर्मित आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा प्रश्न "लहान" नाही, तो जीवघेणा आहे. AQI ७०० हा आकडा दुर्लक्षित करण्यासारखा नाही. तो शहराच्या आरोग्याची धोक्याची घंटा आहे. तो नवी मुंबईच्या भविष्यासाठीचा इशारा आहे. आणि जर आपण आजही जागे झालो नाही, तर उद्या ही परिस्थिती रोजची होईल. माझी मागणी स्पष्ट आहे. नवी मुंबईला स्वच्छ हवा हवी. मुलांना सुरक्षित श्वास हवा. ज्येष्ठांना शांत जीवन हवे. कामगारांना आरोग्य हवे. आणि शहराला जबाबदार प्रशासन हवे.

वायू प्रदूषण हा अजेंड्यावर असायलाच हवा. उद्यापासून नाही, आजपासून.कारण ही केवळ समस्या नाही, ही आपत्कालीन परिस्थिती आहे.

■ - प्रा. विनिल कुमार सिंह
(सामाजिक कार्यकर्ता, पर्यावरणवादी आणि शिक्षक)



Navi Mumbai gears up for Swachh Survekshan 2025-26

■ Navi Mumbai (Nazima Patel):

Navi Mumbai Municipal Corporation (NMMC) is fully prepared for the Swachh Survekshan 2025-26. Commissioner Dr. Kailas Shinde reviewed the planned actions based on the Swachh Bharat Mission Toolkit during a meeting with department heads, including Additional Commissioner Sunil Pawar, the city engineer, sanitation officers, and other senior officials.

Key directives include ensuring regular cleanliness drives, assigning clear responsibilities from inspectors to senior officials, and distributing informational booklets to all stakeholders. NMMC has been selected as a mentor city under the 'Swachh City Jodi' initiative, guiding five other cities in Maharashtra, with nodal officers visiting them over the next two months.

Special focus will be on highway cleanliness, railway stations, markets, and public toilets. Awareness campaigns on reducing single-use plastics, waste segregation at the source, and promoting the "Three Rs" (Reduce, Reuse, Recycle) among students and citizens are planned. Schools will display visual boards and organize cleanliness activities, while sanitary pad vending machines and safety measures for sanitation workers will be monitored closely. Citizens' feedback will be actively addressed, and construction debris management will be strengthened. Navi Mumbai, part of the Super Swachh League, aims to maintain its top ranking through coordinated efforts of officials, representatives, and residents.

This newspaper is published by Sunil D. Tawade from B10/15/2:3, Omkar CHS, Sector 15, Vashi, Navi Mumbai 400705, edited by Sunil D. Tawade and printed by Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd., Plot No. W-230, TTC Industrial Area, Thane-Belapur Road, Khairne MIDC, Navi Mumbai 400710. Editor: Sunil D. Tawade.

Major Accident Averted in Ulwe; Severed Leg Successfully Reattached

Wish 2 Care Multispeciality Hospital Performs Life-Saving Reattachment Surgery

■ Ulwe (Ashwini Tawade):

A horrific accident occurred at a construction site in the Ulwe area while work was in progress. Construction worker Mohan Thapa suffered a severe injury when his leg accidentally came in contact with a grinder machine and was completely severed. The incident created panic at the site, and due to heavy blood loss, the worker's condition became extremely critical.

Following the accident, local residents and co-workers acted swiftly and showed presence of mind by immediately rushing the injured worker to Wish 2 Care Multispeciality Hospital, Ulwe. Upon arrival, the medical team quickly assessed the seriousness of the injury and initiated emergency treatment within the crucial Golden Hour.

The hospital's CEO, Dr. Shubham Pathak, Dr. Mahavir, and their experienced medical team took an immediate decision to perform emergency surgery without any delay. After completing all necessary medical examinations, the patient was promptly shifted to the operation theater.

During a highly complex surgical procedure that lasted nearly two hours, the team of doctors successfully reattached the severed leg. Advanced medical equipment and the expertise of specialist surgeons played a vital role in the success of the operation. Due to timely medical intervention, not only was the patient's life saved, but his leg was also preserved. Speaking



about the case, Dr. Mahavir said, "In such severe accidents, the first hour is extremely critical. Reaching the hospital on time and starting treatment immediately is the key to success. The availability of modern facilities and an experienced medical team helped us perform this surgery successfully."

Dr. Mahavir further added that Wish 2 Care Multispeciality Hospital is the only hospital in the Ulwe area where comprehensive medical facilities are available under one roof. This proves to be a major advantage in handling serious and life-threatening emergencies.

Thanks to the timely assistance of local citizens and the prompt action of doctors, both the life and the leg of a poor construction worker were saved. This incident once again highlights the importance of timely medical care, the Golden Hour, and the crucial role of well-equipped multispecialty hospitals in emergency situations.



Massive Clean-Up at Sarsawle Jetty Engages Students and Citizens

■ Navi Mumbai (Nazima Patel)

As part of Swachh Survekshan 2025-26, a major cleanliness drive was conducted today along the creek near Sarsawle Jetty. The initiative was jointly organized by Navi Mumbai Municipal Corporation, Environment Life Foundation, Mangrove Soldiers, and 8 colleges, with over 200 NSS students participating.

Under the guidance of Municipal Commissioner Dr. Kailas Shinde, the drive successfully collected more than 250 pieces of plastic bottles, thermocol, and other waste. Students took a pledge for cleanliness, and the event witnessed enthusiastic public participation.

Thane Launches Digital ID Cards for Senior Citizens' Bus Travel

■ Thane (Janatecha Navi Mumbai Varta)

Thane Municipal Corporation has decided to issue digital ID cards to senior citizens aged 60 and above for traveling on municipal buses. To facilitate this, sample application forms have been distributed, and the process of submitting completed forms along with necessary documents has begun. Currently, applications are being accepted at Thane Station, Kopri Depot, Anandnagar, and Wagle Depot.

Considering the increasing response from senior citizens, from Saturday, 7 February 2026, application acceptance will also start at Vrindavan Society, Lokmanya Nagar Terminus, Pawar Nagar Terminus, and Dharmveer Chowk. Applications will be accepted at these centers from 9:00 AM to 4:00 PM, and citizens are requested to submit the completed sample forms with the required documents.

The scheme is planned to be launched on 1 March 2026. Meanwhile, senior citizens who have submitted applications will continue to enjoy free travel under the old system until their digital ID cards are issued. The Transport Department has requested the cooperation of senior citizens in this process.

RPI(A) to Strengthen National Organization: Key Decisions in Delhi Meeting

■ Panvel (Janatecha Navi Mumbai Varta)

The Republican Party of India (A) (RPI-A), led by National President and Union Minister Ramdas Athawale, aims to expand its national presence and strengthen its organizational network.

A key meeting of the party's Central Core Committee was recently held at Maharashtra Sabha, Delhi, with representatives from various states in attendance.

The meeting focused on

- **Organizational Strengthening: Building a strong network of workers across all states.**
- **Justice for the Marginalized: Amplifying the voices of underprivileged communities.**
- **Political Direction: Discussing future challenges and social issues.**
- **Honoring Workers: Recognizing and empowering dedicated party workers. Shri Athawale said, "The country needs positive and development-focused politics. With the enthusiasm of our workers, this movement will grow further and serve the people effectively." The meeting has set a new direction for RPI-A's national expansion and energized its cadre.**





Godrej Launches 'Sahayog' Mental Health Program for Construction Workers

■ Panvel (Janatecha Navi Mumbai Varta):

Godrej Properties Limited (GPL), one of India's leading real estate developers, has launched 'Godrej Sahayog,' a new wellness initiative for construction workers at its project sites. The program focuses on mental health and overall well-being, offering 24/7 access to trained mental health professionals, group and individual counseling sessions, and an emergency helpline.

Piloted over six months at six Mumbai sites, the program engaged over 2,000 workers. It is now being expanded to 79 sites across major markets, including Mumbai, Delhi NCR, Bengaluru, Chennai, Pune, Hyderabad, Kolkata, Gujarat, and Chhattisgarh, potentially benefiting 30,000 workers.

Pirojsha Godrej, Executive Chairman of Godrej Properties, stated, "Caring for the well-being of the millions who build our cities is not just a corporate responsibility but a social need. Godrej Sahayog aims to support their mental health and recognize their contribution to nation-building." The initiative underscores Godrej Properties' commitment to inclusive, people-centric development and responsible business practices.



Emotional Farewell Ceremony for Std. 10 Students at Vashi English High School

■ Vashi (Janatecha Navi Mumbai Varta):

Vashi English High School organized a warm and memorable farewell party for the students of Std. 10 on 31st January. The program was thoughtfully conducted by the students of Std. 9 and began with a graceful candle-lighting ceremony, creating an emotional and heartfelt atmosphere.

The event featured a variety of entertaining performances, including energetic dance acts, stand-up comedy, and other cultural activities, all of which were thoroughly enjoyed by the audience. Several students were also honored with special titles during the function.

The prestigious title of Mr. Farewell was awarded to Aditya Padval of Class 10 A, while the title of Miss Farewell was won by a student from Class 10 B. The awards were presented by Principal Mrs. Vibha Mathur and Vice Principal Mrs. Paramjit Kaur.

Teachers from both the secondary and primary sections, along with non-teaching staff members, were present to bless and encourage the outgoing students. The program concluded on a joyful, emotional, and memorable note, leaving behind cherished memories for the students as they prepare for their future endeavors.



'Kirdaar' Theme Highlights Truth, Imagination and Responsibility at Frames Festival

■ Nerul (Janatecha Navi Mumbai Varta)

The 23rd Frames Film Festival continued on 6 February at SIES (Nerul) College of Arts, Science and Commerce (Autonomous), with Day Two dedicated to documentary and animation cinema under the theme "Kirdaar." Organized by the Department of Multimedia and Mass Communication, the day focused on role, responsibility, and purpose in storytelling.

The documentary segment showcased socially relevant non-fiction films, evaluated by filmmaker Ms. Divya Unny and documentary filmmaker Mr. Anu Moothedath, who emphasized ethical representation and narrative integrity. Shortlisted films included Yamuna's Sewage Treatment Plant, Dear Sikhonkwane, Flugten Fra Herstedvester, Be Better, Return To The Sky, Swinging For Tomorrow, and In Search Of The Grey.

The animation segment highlighted creative and technical excellence in animated storytelling. Judged by award-winning filmmaker Mr. Kabeer Khurana and Mr. Vishwang Gowariker, Founder and Creative Director of OOZE Studio, the segment featured shortlisted films such as Dance Again, 113 Words for You Today, Maatitel, Gone Wrong, Rasmalai Banana Ninja, and Cursed. An interactive Q&A session followed the screenings. he festival was held under the guidance of Principal Dr. Koel Roy Choudhury, HoD Mr. Mithun Pillai, Chairperson Mr. Abhishek Dandekar, and the faculty of the department, reaffirming Frames Film Festival's commitment to nurturing young filmmakers and socially responsible cinema.

Congress Leader Mahendrasheth Gharat Casts Vote with Spouse in Guhvan

■ Uran (Janatecha Navi Mumbai Varta)

Guhvan Panchayat Samiti and Zilla Parishad elections, international labor leader and Congress Raigad district president Mahendrasheth Gharat, along with his wife Shubhangitai, voted at the Zilla Parishad school in Guhvan on Saturday.

Speaking on the occasion, Mahendrasheth Gharat said, "Voting is a sacred duty. I have cast my vote to protect and strengthen democracy. In Guhvan, the contest will be between party workers and leaders. The BJP workers who served for eleven years have been ignored, and Ramseth Thakur has given tickets to his close aides instead. This has caused significant dissatisfaction among BJP workers. The same situation is prevailing across the district. Therefore, I am one hundred percent confident that the candidates of the Mahavikas Aghadi will be elected with a majority and that the Mahavikas Aghadi will gain power in the Zilla Parishad and Panchayat Samitis in the district." During the day, Mahendrasheth Gharat also visited various polling centers in Uran and Panvel talukas and interacted with party workers.




Navi Mumbai Artist Anusha Krishna Impresses at India Art Festival

■ Navi Mumbai (Janatecha Navi Mumbai Varta):

Navi Mumbai–based emerging artist and visual storyteller Anusha Krishna showcased her distinctive artworks at the India Art Festival, held from January 30 to February 1 at the Nehru Art Centre, Worli, Mumbai. Her paintings received an overwhelming response from art lovers, critics, and visitors, making this a significant milestone in her creative journey.

Having been drawn to art since childhood, Anusha Krishna has given a more defined shape to her artistic pursuits in recent years. She actively works across painting, photography, and visual storytelling. After marrying a filmmaker, her life moved closer to the world of visual media and narrative expression, a transition that is strongly reflected in her artistic language. Five years ago, she began formal training in fine art under renowned artist Leo Roy. Currently, she works primarily with acrylic on canvas, and her style shows clear influences of impressionism and cubism, along with explorations in expressive and minimal art forms. Nature and Indian mythology serve as her primary sources of inspiration, through which she powerfully conveys themes of movement, stillness, balance, and inner emotion.



At the festival, artworks such as "Where Nature Breathes," "Shiva—Ananda Tandava," and "Airavata—Majesty in Stillness" emerged as major attractions. These works stood out for their emotional depth and strong visual storytelling. Alongside her studio practice, Anusha Krishna also conducts art workshops in Navi Mumbai, where she guides beginners in creating an acrylic painting on canvas within just three hours, making art more accessible and engaging. Adding to her success at the festival, renowned art collector Krishna Nair purchased one of Anusha Krishna's artworks, marking a proud and memorable moment in her artistic career. More updates on Anusha Krishna's artworks, initiatives, and workshops can be followed on Instagram at @anusha_shuttercanvas.

12-Year-Old Swaraj Patil Swims 18 km Sea Stretch in Record 5 Hours!

■ Uran (Janatecha Navi Mumbai Varta):

Uran's 12-year-old swimmer Swaraj Sonali Santosh Patil has created history by swimming 18 km from Kasa Rock to Khanderi Fort in just 5 hours and 6 minutes. A student of St. Mary's Convent School, Swaraj has carried forward his mother's legacy in swimming.

Earlier, he had swum 12 km from Mora Jetty to Mumbai's Gateway of India in 4 hours 25 minutes. Swaraj trains rigorously at the Uran Municipal Swimming Pool and has become the youngest swimmer to achieve such a feat in record time.

Starting at 11:50 PM from Kasa Rock, he overcame challenges like darkness, high waves, strong winds, and passing ships. His achievement



is being widely praised, reflecting his dedication, disciplined lifestyle, and strong family support, especially his mother's guidance.

Swaraj aims to take on bigger sea challenges in the future, including international events like the English Channel, inspiring many children to pursue swimming and sports. His record is a shining example of perseverance, determination, and the power of proper guidance.